Ref. No. Date : / /20

**3.3.2 Number of research papers per teachers in the Journals notified on UGC website during the year-2022-23**

| Title of paper | Name of the author/s | Department of the teacher | Name of journal | Year of publication | ISSN number |
|---|---|---|---|---|---|
| A nonparametric control chart for joint monitoring of location and scale | Vijaykumar Ghadage1 and Vikas Ghute | Department of the statistics | Reliability: Theory & Applications. | 2023 | ISSN 1932-2321 |
| Green Approach to the Design of Synthesis of Benzopyran Derivatives by Using as Greener Gel Entrapped Catalysts | Shital Shinde, Rajashri Salunkhe | Department of the Chemistry | International Journal of Scientific Research in Science and Technology | 2023 | ISSN: 2395-6011 |
| One Pot Environmental Benign Synthesis of Quinoline-3-Carbonitrile Derivatives | Kadam S. N and Adlinge N. P | Department of the Chemistry | International Journal of Scientific Research in Science and Technology | 2023 | ISSN: 2395-6011 |
| Mental Health and Physical Training for School Physical Education Teachers | Pawar V M | Department of Physicsl education | Education and Society | 2023 | ISSN: 2278-6864 |

**Dr. S.S. Dhasade**
Coordinator,IQAC
Dr. Ganpatrao Deshmukh Mahavidyalaya,
Sangola Tal.Sangola Dist. Solapur

**Principal**
Dr.Ganpatrao Deshmukh Mahavidyalaya
Sangola Tal. Sangola Dist. Solapur

Scanned with OKEN Scanner



'Sangola Taluka Shetkari Shikshan Prasarak Mandal Sangola's

# DR. GANPATRAO DESHMUKH MAHAVIDYALAYA SANGOLA

**(Arts & Science, E.C.S. & B.C.A.)**

**Tal. Sangola Dist. Solapur Pin. 413 307 (Maharashtra)**

(Affiliated to P.A. H. Solapur University)

☎ Off. (02187) 220508

Mob. No. 9850792244

Email : vidnyanms@yahoo.co.in

Website : www.vmssangola.org

Principal : **Dr. S.M.Mulani**

M.A.Ph.D. (Geography)

(Third Cycle Accredited by NAAC with 'B' Grade (CGPA of 2.24)

**Ref. No.** **Date : / /20**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Ganapatraoji Deshmukh's Contribution in Drought Regions - A Developmental Study | Vakade A K | Department of Political science | International journal of advanced and applied research | 2023 | ISSN – 2347-7075 |
| Different Data Mining techniques Used for Data Analysis | Bhanvase D P | Department of Computer science | Journal of Emerging Technologies and Innovative Research | 2023 | ISSN - 2349-5162 |
| A novel that meets the challenge of contemporaneity | Mane K S | Department of Marathi | Akshar Wangmay | 2023 | ISSN - 2229-4929 |

**Dr. S.S. Dhasade**
Coordinator,IQAC
Dr. Ganpatrao Deshmukh Mahavidyalaya,
Sangola Tal.Sangola Dist. Solapur

**Principal**
Dr.Ganpatrao Deshmukh Mahavidyalaya
Sangola Tal. Sangola Dist. Solapur

Scanned with OKEN Scanner

# अक्षर वाङ्मय

एप्रिल-मे-जून २०२३

वर्ष : तेरावे अंक : चौथा



संपादक

डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

आर. एन्. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

34/13/04
10/07/2023

# अक्षर वाङ्मय

वर्ष : तेरावे अंक : चौथा

एप्रिल-मे-जून २०२३

संपादक

डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

कार्यकारी संपादक

डॉ. शिवाजीराव देशमुख

मार्गदर्शक

डॉ. अरुण प्रभुणे

संपादक मंडळ

डॉ. विजय वारकड
डॉ. रत्नाकर बेडगे
डॉ. दीपक चिद्दरवार
डॉ.अंजली मस्करेन्हस

अमेरिकेतील समन्वयक

रमेश देशपांडे • किशोर व ब्रिजेट करकेरा • सोनाली जांभेकर

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.

मुद्रक : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., १४१६, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

**वार्षिक वर्गणी :** रु. ५००/-
**द्विवार्षिक वर्गणी :** रु. ९००/-
**पंचवार्षिक वर्गणी :** रु.२०००/-
**अंकाचे मूल्य :** रु. १२५/-

* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रम


- संपादकीय ---------------------------------- ५
- मुखपृष्ठाविषयी ---------------------------------- ७
- आंध्र प्रांतातील शिलालेख आणि ग्रंथात प्रकट झालेली विठ्ठल भक्ती.. १५
  **डॉ. नाथराव गरजाळे**
- दक्षिण कोकणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या
  दंतकथा आणि इतिहास ------------------------ २२
  **डॉ. विकास शंकर पाटील**
- गोमंतकीय लोकसाहित्य आणि सीमाभागातील लोकसंस्कृती :
  एक अनुबंध ---------------------------- २८
  **प्रा. डॉ. मुतवली मौजोद्दीन मैनोद्दीन**
- संत तुकारामांच्या अभंगातील समाजमूल्ये --------------- ३३
  **प्रा. डॉ. पांडुरंग गायकवाड**
- समकालीन मराठी कविता ------------------------ ४०
  **डॉ. विजय केसकर**
- रंगनाथ पठारे : व्यक्ती आणि वाङ्मय ----------------- ५१
  **डॉ. राजेंद्र सलालकर**
- अहिराणी बोलीभाषेतील पहिले लोकशाहीर : वामनदादा गरुड ---- ६१
  **डॉ. सुरेश विनायक जाधव**
- ग्रामगीता, विकासाची संकल्पना आणि
  लोकसहभागासाठीचा संवाद- ---------------------- ६८
  **योगेश बोराटे**

□ २१ व्या शतकातील गोमंतकीय मराठी कवितेचे स्वरूप -------- ७५
**डॉ. सुनीता उम्रस्कर**

□ नितळ व्यक्तिमत्त्वाचे प्रांजळ आत्मकथन- स्मृतिसाद ---------- ८२
**डॉ. वासुदेव मुलाटे**

□ कृषि संस्कृतीच्या यशापयशाचा वेध घेणारा ग्रंथ :
'शेतकरी जीवनसंघर्ष : ऐतिहासिक परामर्श' -------------- ८७
**डॉ. अनंता सूर**

□ समकालीनतेचे समर्थ आव्हान पेलणारी कादंबरी ------------ ९१
**डॉ. किसन माने**

□ केशव बा. वसेकर यांची बालकविता-२ ---------------- ९८
**प्रा.डॉ. मथुताई सावंत**

□ मल्लीका सेनगुप्ता आणि सुबोध सरकार बांगला साहित्यातील
असाधारण दाम्पत्य -------------------------- १०६
**ऊर्मिला राघवेंद्र चाकूरकर**

□ मराठी वाङ्मयाचे अध्ययन आणि अध्यापनापुढील प्रश्न ------ ११९
**डॉ. गणपतराव ढेंबरे**

□ 'अक्षरवाङ्मय'चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ------- १२८

□ संपादक मंडळ ----------------------------- १३१

□ वार्षिक हिशोबपत्र --------------------------- १३२

# समकालीनतेचे समर्थ आव्हान पेलणारी कादंबरी

– डॉ. किसन माने

प्रास्ताविक

आपल्या देशामध्ये १९९१ पासून जागतिकीकरणाचे वारे मोठ्या प्रमाणात वाहू लागले. या जागतिकीकरणाची ऊब गाव, खेड्यांपासून ते थेट महानगरांपर्यंत जाणवू लागली. भारत हा जसा खेड्यांचा देश आहे तसा तो शेतीप्रधानही आहे. आजही अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह शेतीवरच अवलंबून आहे. म्हणून ग्राम व्यवस्थेमध्ये शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन खेडे आणि जागतिकीकरणानंतरचे खेडे यात खूप मोठे बदल झालेले दिसून येतात. जागतिकीकरणानंतर खेड्यांबरोबर मानवी जीवनातही बदल झालेले आहेत, हे आपण नाकारू शकत नाही. परंतु जागतिकीकरणामुळे मुक्त व्यापार सुरू झाला. जे भांडवलदार व धनदांडगे आहेत ते व्यापाराच्या माध्यमातून गरीब व सर्वसामान्य लोकांवर कब्जा मिळवू लागले. मोठमोठ्या शहरांजवळ –जमिनी आहेत, त्या जास्त दराने खरेदी करून शेतकऱ्यांना विकासाचा भोत दाखवू लागले. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर, कामगार व अल्पभूधारक शेतकरी उद्ध्वस्त होऊ लागला. त्याच्या झळा शेतकरी व शेतमजुरांना बसू लागल्या. जागतिकीकरणामुळे शेतकरी वर्गाचा संघर्ष अधिकच तीव्र होताना दिसतो. हे बदललेल्या शेतकरी जीवनाचे चित्रण १९९० नंतरच्या कादंबरीतून आले आहे. आर्थिक विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन त्यांना वाऱ्यावर सोडून देणारे वास्तव चित्र विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती' व शंकर सखाराम यांच्या 'एस.ई. झेड'. (सेझ) या कादंबरीतून त्यांनी रेखांकित केले आहे. मोहन पाटील यांच्या 'वस्तान' व सीताराम सावंतांच्या 'भुई भुई ठाव दे' या कादंबऱ्यांमधूनही आधुनिकीकरणामुळे शेतीवर होणारे आक्रमण व नागरीकरणाच्या आर्थिक हव्यासापोटी शेतजमिनीचे तुकडे करणे यामुळे शेतकरी कसा संकटात सापडलेला

आहे, या ज्वलंत प्रश्नांवर कादंबरीकाराने परखडपणे भाष्य केल्याचे दिसून येते. हाच धागा महेश निकम यांनी नेमकेपणाने 'भोत' कादंबरीत पकडलेला आहे. मात्र 'भोत' ची म्हणावी तितकी दखल घेतलेली दिसून येत नाही.

### 'भोत' - जागतिकीकरणानंतरच्या बदलत्या ग्रामीण वास्तवाची दखल

जागतिकीकरण व मुक्त अर्थ व्यवस्थेचा स्वीकार करून शेतकऱ्यांना आर्थिक विकासाची मोठ-मोठी स्वप्ने दाखविण्यात आली. ग्रामीण भागातील शेती सुधारणांच्या नावाखाली विकासाचा अजेंडा दाखवून शेतकऱ्यांच्या जमिनी भांडवलदार वर्गाने गिळंकृत केल्या. त्यामुळे खेड्यांतील कृषी संस्कृतीवर काय परिणाम होतात, त्यातून नव-नवे प्रश्न कसे उभे राहतात, एकूणच महाराष्ट्रातील शेतकरी जीवन उद्‌ध्वस्त होणाऱ्या प्रश्नांवर डॉ. महेश निकम यांनी 'भोत' ही कादंबरी लिहून शिक्षण, समाजकारण, राजकारण व कुटुंबकारण यावर नेकीने प्रकाशझोत टाकला आहे. प्रस्तुत कादंबरीच्या सुरुवातीलाच लेखक संत कबीराच्या दोह्यातून सांगतात,

कहे कबिरा जग है अंधा । अंधी जैसी गाय
बछडा था, सो मर गया । झुटी चाम चटाय ।

आजचे जग गाईप्रमाणे आंधळे आहे. तिचे वासरू मरते अन् गवळ्याचे दूध बंद होते. तो गवळी मृत वासराचे कातडे सोलतो आणि त्यात गवत-भुसा भरून तो नकली 'भोत' गायीपुढे ठेवतो. गाय फसते. तिला ते आपले जिवंत वासरू वाटते. ती पुन्हा दूध द्यायला लागते, ती डोळे असून आंधळी बनते. असा गवळी खूप प्राचीन काळापासून या गाईच्या उज्ज्वल भविष्याचे चित्र दाखवून समाजाला फसवत आला आहे.

गाय म्हणजे समाज
वासरू म्हणजे त्या समाजाचे भविष्य
गवळी म्हणजे इथली व्यवस्था

गवळी जसा दुधाचा व्यापार करण्यासाठी गाईला फसवतो, त्याच प्रमाणे आजपर्यंत अनेक सत्ताधाऱ्यांनी स्वत:चे सत्तास्थान बळकट करण्यासाठी शेतकऱ्यांना अमिषे दाखवून भविष्यातील आशेचा केवळ निर्जीव 'भोत' करून फसवले गेले आहे. हाच उद्योग आजही सुरू आहे, हेच या कादंबरीच्या

केंद्रस्थानी आहे.

आपल्या देशात भाबडे शेतकरी शेतीवाडीचा विचार न करता मोठ्या कष्टाने मुलांचे शिक्षण पूर्ण करतात. परंतु नोकऱ्या आहेत कुठे? त्यासाठी पैसा, वशिला लागतो, तो आणायचा कोठून? भ्रष्टाचाराने देशाला झपाटून टाकले आहे. पदाधिकारी, मंत्री, अधिकारी मालामाल होत आहेत आणि शेतकरी आत्महत्या करीत आहेत, अशी ही आजची शोकांतिका आहे. असे शेतकऱ्यांच्या जीवनाचे वास्तव चित्र 'भोत' मध्ये रेखाटून लेखकाने वाचकाला अंतर्मुख केले आहे.

**'भोत' चा कथानक विचार**

सिद्धेवाडी हे गाव, गावाची शेती हीच उपजिविकेची गंगोत्री. पाऊस येवो, न येवो परंतु कष्ट करून चिवटपणे गावपण टिकवलेले हे गाव. या गावात जिवंतपणा आहे. जुनी पिढी नव्या पिढीकडून शिकून, नोकऱ्या मिळवून या मरण यातनेच्या कष्टातून मोकळे होण्याची ही अपेक्षा ठेवते. परंतु गावात बेकारांचा लोंढा. शिक्षक, प्राध्यापक व्हायचे आहे. परंतु पैशांचा प्रचंड बाजार, डोंगरासारखा आडवा आहे. पाच पाच आणि दहा दहा लाख रुपये आणायचे कुठून? जमिनी विकून तर नोकरी मिळवायची असती तर ती यापूर्वीच्या लोकांनी मिळविली असती. ते त्यांना नैतिक वाटत नाही. हा बेकारांचा मेळा गावात सकाळ- संध्याकाळ आपल्या अस्तित्वाला व नाकर्तेपणाला टिंगलीचा विषय बनवितो. वरून-वरून हसतात पण, आतून रडतात. अशातच पुंडलिक या नव्या युवकाची बेकारात भर पडते. या पुंडलिकाचे घर-कुटुंबच 'भोत' च्या केंद्रस्थानी आहे. घरात तात्या, राही अक्का, पुंडलिक, श्रावण्या आणि सर्वांत लहान जनी जरी हे कुटुंब कादंबरीच्या केंद्रस्थानी असल्यासारखे वाटते; तरी गावातील अनेक कुटुंबं म्हणजेच सबंध गावच केंद्रस्थानी राहते. या गावाला रस्ते, पाणी उत्पादनाच्या कोणत्याच गोष्टी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून आजपर्यंत मिळालेल्या नाहीत. परंतु अचानक गावाशेजारून डांबरी हायवेचे काम चालू होते; गावाच्या दृष्टिने गावचे प्रश्न निकाली निघत आहेत. परंतु गावापुढे पहिला फसवा 'भोत' मांडला जातोय याची गावाला खबरच नाही. याची खबर फक्त गावातील आबा जाधव या सरपंचाला मात्र आहे. गावाच्या जवळच्या माळावर 'विशेष आर्थिक क्षेत्र' (Special Zone Economics) म्हणून

कारखाने होणार आहेत. लवकरच माळावरच्या व जवळपासच्या जमिनी संपादित केल्या जाणार आहेत. सरपंचाला ही धनदांडगे बनण्याची नवी संधी वाटते. माळासह माळाच्या आसपासच्या जमिनी गावातील गरीब लोकांकडून मिळवून देण्याची जबाबदारीच तो स्वीकारतो. त्याचा मुलगा संदीप आणि तात्याच्या वारकरी कुटुंबातील श्रावण्या त्यासाठी रात्रंदिवस लोकांच्या मागे दलालांच्या भूमिकेत हिंडू लागतात; तेच दोघे गावात जुगार अड्डाही चालवतात आणि गावाबाहेर दूरवर दारू काढण्याचेही काम करतात. वारकरी कुटुंबातील असूनही शिक्षणाला नाकारणारा, छंदी फंदी राहू पाहणारा श्रावण्या संदीपसोबत काम का करतो, तर त्याचे सरपंचाच्या मुलीवर प्रेम आहे. ते दोन्ही कुटुंबाला माहीत नाही. एकीकडे दहावी शिकूनही श्रावण्या घरात पैसा आणू लागला; परंतु नुकताच बी. एड्. होऊन आलेला पुंडलिक कुचकामी ठरू लागतो. तो रोजगार हमीच्या चारीवर काम करू लागतो; पुढे तात्याचे मित्र रंगाभाऊ यांच्या शाळेत शिक्षक म्हणून तो फुकट राबू लागतो. परंतु या बिनपगारी नोकरीमुळे घरात तो आई, बहीण, भाऊ यांच्याकडून अपमानीत होऊ लागला. दुखावला जावू लागला. म्हणून दिवसभर फुकट मास्तरकी आणि रात्री माळावर काम करायचे चालू होते. पुढे श्रावण्या जमीन विका, पैसा मिळवा, संधी आली आहे, पिढ्यान् पिढ्यांचं दुखणं संपवा म्हणून तात्याला गळ घालू लागला. परंतु तात्यांचा त्याला कडाडून विरोध होतो. पुंडलिक मात्र कधी तात्या तर कधी श्रावण्या यांच्या द्वंद्वात उभा राहतो. त्याला कधी तात्या बरोबर वाटतात; तर कधी श्रावण्या. परंतु पिढ्यान्- पिढ्या पोटाला चार घास देणाऱ्या जमिनीला विकू नये, असे तात्यांना वाटत असते. त्यात मध्येच जनीच्या लग्नासाठी एक एकर शेत नाईलाजाने त्यांना विकावे लागतेच. पण, त्यामुळे श्रावण्या पुन्हा पेटून उठतो, तात्या पुंडलिकाशी भांडतो. वाटण्या करा म्हणतो परंतु तात्या त्याच्याकडे लक्ष देत नाहीत. कारण श्रावण्या घर मोडू पहातोय, घरात चुकीच्या मार्गाने पैसे आणतोय, घरात मटण आणून वारकरी घराला कलंक लावू पाहतो आहे, हे तात्यांना कळलेले आहे. शिवाय संदीप श्रावण्याला दारू पाजून फूस लावून तात्याला संपवण्याचे षडयंत्र सुरू करतो. एके दिवशी दुपारी उभ्या ज्वारीच्या रानात खोपीत झोपलेल्या तात्याला मारण्यासाठी ते पोहोचतात; त्यांच्या सुदैवाने तात्या आधीच साप चावून संपलेले असतात. मग स्टँपवर

अंगठा घेतला जातो; खोट्या सह्या करून तात्याची जमीन श्रावण्या व संदीप एका कंपनीला विकून टाकतात. राही अक्का व पुंडलिक पूर्णपणे उद्ध्वस्त होतात. पुढे तात्याचे जावई 'सचिन पावणं' हे पुढाकार घेऊन पुंडलिकाचा एका पगारदार मास्तरीण मुलीशी त्याचा विवाह करून देतात. तात्याचं दुःख विसरून राही अक्का जनीच्या मुलांसाठी आणि पुंडलिकासाठी जगू लागते. पुढे श्रावण्याचे लफडे, भांडणे, विवाह हा प्रसंग येतो. ती दोघे वेगळेच म्हणजे आबा सरपंचाच्या घरीच राहू लागतात. त्यामुळे पुंडलिक दुसऱ्यांदा तुटतो. मामाच्या मुलीवर प्रेम असूनही पगार नसल्याने त्याला जिच्याबरोबर विवाह केला आहे ती बायको पगारातील एक पैसाही घरात देत नाही; उलट पती म्हणून पुंडलिकला स्पर्शही करू देत नाही; त्याला अपमानित करीत असे. त्यातच ती 'सतीश पावणं' यांच्याशी अनैतिक संबंध ठेवून आहे; हे जेव्हा त्याला कळते तिथे पुन्हा दोघांत वाद होतो. तो तिला हाकलून देतो. परंतु राही अक्का व पुंडलिक यांच्यावरच ती केस ठोकते. अक्काला पोलिसांकडून मारले जाते. पुंडलिक पुन्हा तुटतो, त्याला क्षय होतो. अक्का वेडी होते. तोही वेडाचे कातडे पांघरतो, मग मात्र श्रावण्याला कीव येते. त्यावेळी तो धावून येतो; परंतु खूप उशीर झालेला असतो. अशा प्रकारची गावात अनेक कुटुंबांची झालेली वाताहत प्रस्तुत कादंबरीत प्रकर्षाने दिसून येते. या मुख्य प्रसंगाभोवती अनेक प्रसंग येतात. त्यातही जमिनी विकणे, पैसा येणे, मौज- मजा करणे, वासनांधपणा बोकाळणे; शिक्षणातही बाजारीकरण येणे, जुने गाव तुटणे; गावाकडे शहरातील चंगळवाद, भौतिकवाद येण्याचे हे परिणाम आहेत. व्यवस्थेला नव्या आर्थिक विकासात, गावाला घ्यायचे नाही; त्याचा फक्त वापर केला जातोय. हे 'भोत' चे मध्यवर्ती सूत्र आहे. म्हणून लेखकाने हा 'भोत' नाही तर आणखी काय? असा सवालच या कादंबरीतून व्यवस्थेला विचारला आहे.

### 'भोत' मधील व्यक्तिदर्शन

बदललेल्या सामाजिक वास्तवाचा शोध घेण्याचे काम कादंबरीकाराने व्यक्तिरेखा चित्रित करून केले आहे. विविध व्यक्तिरेखांतून जागतिकीकरणानंतर ग्रामीण जीवनातील अनेक कंगोऱ्यांना स्पर्श केला आहे. 'भोत' मधील प्रमुख व्यक्तिरेखेबरोबर गौण व्यक्तिरेखाही कादंबरीला उठावदारपणा आणून देतात.

शिवाय कादंबरीत उपयोजलेल्या स्त्री व्यक्तिरेखाही महत्त्वाच्या आहेत. विविध व्यक्तिरेखांची मनोवृत्ती, आशा, आकांक्षा आणि त्यांचा स्वभाव त्यांच्या बोलण्या-वागण्यातून व्यक्त होताना दिसून येतो. जागतिकीकरणानंतर लोकजीवनावर झालेला परिणाम, सरकारवरची चीड व शिक्षण घेऊनही बेरोजगारीचा परिणाम व्यक्तिदर्शनाच्या अनुषंगाने लेखकाने अंतर्मुख होऊन कादंबरीच्या रूपाने मांडला आहे. शेतकरी कुटुंबांना उद्ध्वस्त करणारी जाणीव विविध व्यक्तिरेखांच्या वर्णनातून स्पष्टपणे अधोरेखित होताना दिसून येते.

'भोत' कादंबरीला सिद्धेवाडी या ग्रामीण भागातील खेड्याची पार्श्वभूमी लाभली आहे. पांढऱ्या खेळण्यातले काळे राक्षस शेतकऱ्यांना कसे लुटतात. हे पात्रांच्या तोंडी येणारी वाये शेतकऱ्यांच्या सत्य स्थितीवर भाष्य करतात. पुंडलिक, तात्या, राही अक्का, श्रावण्या, जनी, सरपंच आबा जाधव, अप्पा, बाळ्या, धोंड्याभाऊ व हऱ्या न्हावी या व्यक्तिरेखांमधून जागतिकीरणानंतर झपाट्याने बदललेल्या ग्रामीण जीवनाची शोककळा लेखकाने रेखाटून वाचकांना अंतर्मुख केले आहे. स्वत:ची शेती असताना दुसऱ्याच्या शेतात अभंग गात राबणारा व पोरापेक्षा मातीवर जीव असणारा तात्या, दुष्काळी कामात गुंतलेली राही अक्का, शिक्षण पूर्ण होऊनही रोजगार हमीच्या कामावर जाणारा पुंडलिक, शिक्षणाचा तिरस्कार करणारा उद्धट व छंदी-फंदी राहणारा श्रावण्या, गावाच्या पुढे फसवा भोत उभा करणारा सरपंच आबा जाधव, मास्तरकी करण्यापेक्षा हजामत केलेली बरी, असा म्हणणारा हऱ्या न्हावी. नोटा जाळून शेकत बसू का? असा सांगणारा धोंड्याभाऊ, सडेतोड बोलणारा अप्पा, जमीन विकून प्रचंड पैसा आल्यामुळे वेडा झालेला बाळ्या, दलालाच्या मागे लागणारा संदीप या काही व्यक्तिरेखा काळानुरुप बदललेल्या दर्शविल्या आहेत. त्याबरोबर जागतिकीकरणानंतर ग्रामीण जीवनात होणारी उलथापालथ व शेतकरी वर्गाच्या जगण्यातील घुसमटही या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून व्यक्त होते, हे विशेष!

**'भोत' ची भाषा**

या कादंबरीत तृतीय पुरुषी निवेदन आले असले तरी, या कादंबरीची अनेक प्रसंग उभे करण्याची भाषिक ताकद तिच्या भाषेत आहे. कादंबरीत म्हणींचा, वाक्प्रचार व ग्रामीण बोली भाषेतील शब्दांचा फार मोठा वाटा आहे.

अक्का. जनीच्या तोंडी अत्यंत अर्थपूर्ण वाक्‌प्रचार आले आहेत, म्हणी आल्या आहेत. जवळ जवळ १५० म्हणी येतात. उदा. 'तुला लय कळतं, बिन पावसाचं घर गळतं, आहारातला जीव कहारात आणि बाजारातला बैल दारात, आता काय करण्या, तुरीच्या वरण्या, दिसाय देखणी अन् कात हेकणी, ज्याला-त्याला घ्यावं, मग सरकारला काय द्यावं, ज्याचा माल त्याचे हाल अन् कोल्ही-कुत्री लाल, दोन दिसात अन् कोल्हं ऊसात, कशाचं काय अन् फाट्यात पाय, घाईत घाई न्हानं आलं बाई. अशा अनेक म्हणींमधून नेमक्या अभिव्यक्तीची गरज पूर्ण होते. अर्थासाठी भाषेला ओढाताण करावी लागत नाही. उलट अल्प शब्द माधुर्यातून नेमका आणि स्पष्ट अर्थ तर लागतोच; शिवाय ग्रामीण भाषेची सांस्कृतिक, प्रादेशिक वैशिष्ट्ये वाचकांना अत्यंत प्रभावित करतात.

**प्रा. डॉ. किसन माने**
विज्ञान महाविद्यालय, सांगोला, जि. सोलापूर.
भ्रमणध्वनी- ९४२३३२७४११.

□□□

'अक्षर वाङ्मय' ची वर्गणी मनीऑर्डर / धनादेश /धनाकर्ष संपादक 'अक्षर वाङ्मय' या नावे किंवा मेल ट्रान्सफरने वर्गणी जमा करावयाची असल्यास भारतीय स्टेट बँक शाखा, अहमदपूर, जि. लातूर येथे जमा करावी.

**खाते:** संपादक 'अक्षर वाङ्मय' खाते क्र. ३६८३२८४६७५६
IFSC बँक क्र. SBIN - 0020041 या बँकेतील
अक्षर वाङ्मय खाते क्र. ३६८३२८४६७५६

वार्षिक वर्गणी रु. ५००/-
द्विवार्षिक वर्गणी रु. ९००/-
पंचवार्षिक वर्गणी रु. २०००/-
गुगल पे नं.- ९४२३६५५८४१